“दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटांतून साधलेला लोकसंवाद“

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत मास कम्युनिकेशन ॲन्ड जर्नालिझम या विषयात **Ph.D.** पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

जाधव सुनिल माधवराव

M.J. & M.S., M.Phil. (Media Science)

मार्गदर्शक

डॉ. सुहास पाठक

प्राध्यापक

स्कुल ऑफ मिडीया स्टडीज

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

स्कुल ऑफ मिडीया स्टडीज

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर 2024

''दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटांतून साधलेला लोकसंवाद''

प्रस्तावना :

मनोरंजन उद्योग हा जगातील प्रमुख अशा महत्वाच्या उद्योगापैकी एक मानला जातो. ऊर्जा, पर्यटन यानंतर मनोरंजन व माध्यम या उद्योगाचा क्रम लागतो. संबंध जगातील मनोरंजन उद्योगाचा विचार करता चित्रपट माध्यमासाठी भारत स्वर्गभुमी आहे असे म्हटले जाते. नाविण्य कल्पकता व कलात्मक यांचा त्रिवेणीसंगम भारतीय चित्रपटातून घडुन आलेला आहे. त्यातल्या त्यात सामाजिक वास्तवाचा शोध घेतला असता असे दिसते की भारतीय चित्रपटाच्या माध्यमातुन सामाजिक वास्तवाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न वैधकितेने केला जातो. दादा कोंडके दिग्दर्शित चित्रपटातून साधलेला लोकसंवाद अभ्यासतांना या प्रबंधात एक नवीन समाजशास्त्रीय दृष्टीकोण अभ्यासातून दादा कोंडके यांच्या चित्रपटाचे यशापयशाचे साक्षेपी मुल्यमापन करावयाचे आहे.

दिवसेंदिवस इलेक्ट्रानिक माध्यमाचे महत्व मोठ्या प्रमाणात वाढत आहे. चित्रपट हे माध्यम इलेक्ट्रॉनिक माध्यमाची एक शाखा म्हणून ओळखली जाते. भारतीय कला सृष्टीमध्ये विविध कलांचा समावेश असला तरी त्यात चित्रपटाचे स्थान वैशिष्टयेपुर्ण आहे. त्यातील प्रभावी दृकश्राव्य माध्यम म्हणून चित्रपट संज्ञापनाकडे बघितले जाते. विज्ञानयुगात अनेक नवनवीन अविष्काराने आपले लोकजीवन व्यापुन टाकले आहे. यातून विकसित झालेली विविध प्रसार माध्यमे समाजाच्या मानसिकतेत एकरुप झालेली आढळून येतात.

डेनिस मॅकविल म्हणतात, ''सहभाग हा संवादाचा आत्मा आहे पण तो जेव्हा सर्व पातळ्यावर उतरतो तेंव्हा त्यात व्यापक रुप प्राप्त होते.'' चित्रपटाचा अभ्यास म्हणजे समाज जीवनाचा अभ्यास, इथल्या बदलत्या घडमोडींचा अभ्यास, मानवी मुल्यांचा बदलता सांस्कृतिक अभ्यास आणि उद्याच्या स्वप्नातील भारत उभी करणारी ही संज्ञा आज समाजाच्या तळागळापर्यंत जाऊन पोहचली आहे. चित्रपटाचा अभ्यास समाजशास्त्रीय आवश्यकता आहे. पन्ना शहा चित्रपट माध्यमाविषयी लिहितात ''चित्रपट हे असे प्रभावी माध्यम आहे की, त्यामध्ये सामाजिक बदल, लोकशिक्षण शुल्लक परंतु अत्यंत गंभीर स्वरुपाच्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेतलेला असतो.''

ध्वनी व चित्र या दोघांचा गतीमान संगमातुन चित्रपट माध्यम जन्माला आले आहे. श्रोते व प्रेक्षक यांना रुपेरी पडद्यावर खिळवून ठेवण्याचे कार्य चित्रपट माध्यम करते. या माध्यमात त्यामुळे जादुची चटई असे मार्शल मॅक्लुहान (Marshall McLuhan) यांनी संबोधले आहे. चित्रपट माध्यमाचे नव्या समाजातील सतत महत्व वाढत आहे. त्याच्या प्रभाव क्षमतेचे महत्व लक्षात घेतांना त्याच्या इतिहासावर प्रकाश टाकने योग्य होईल. सुरुवातीला इंग्रजी अंमलातील चित्रपटाचा विकास झाला. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असल्याने भारतीय चित्रपटातील पहिले प्रयोग हे मुंबई नगरीत झाले. भारतीय चित्रपटाचे पितामह दादासाहेब फाळके यांच्या अगोदर एस.एच. भाटवडेकर यांनी इंपोर्टेड कॅमेऱ्यावर दोन पहिलवान आणि माकडाला शिकवणारा मनुष्य असे दोन छोटे चित्रपट तयार केले व ते लोकांना दाखविले.

दादा कोंडके म्हणजे कृष्णा (दादा) खंडेराव कोंडके (8) ऑगस्ट 1932 ते 14 मार्च 1998) एक भारतीय अभिनेता आणि चित्रपट निर्माता होता. दादा कोंडके हे मराठी चित्रपट सृष्टीतील सर्वात प्रसिध्द व्यक्तीमहत्वापैकी एक होते. जे

चित्रपटामधील त्यांच्या दुहेरी संवादासाठी प्रसिध्द होते. दादा कोंडके यांचा जन्म मुंबईतील मोरबाग भागातील किराणा दुकान आणि चाळीचे मालक असलेल्या कुटुंबात झाला. कोंडके यांना दादा असे संबोधले जायचे. 1970 ते 1990 या दशकांच्या सुरुवातीपासुन दादा कोंडके आणि त्यांच्या चित्रपटांनी मराठी चित्रपट सृष्टीवर वर्चस्व गाजवले. कोंडके यांनी मराठी चित्रपट सृष्टीमध्ये प्रेक्षकांची आवड टिकुन ठेवण्यासाठी महत्वपुर्ण भुमीका बजावली. त्यांचे चित्रपट सौंदर्यांच्या गुणवत्तेवर कमी होते. परंतु ॲनिमेटेड कॉमिक कामगिरीवर उच्च होते. त्यात डब्बल एन्टेडरचा समावेश होता. मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत सेक्स कॉमेडी हा प्रकार आणण्याचे श्रेय त्यांना मिळाले. दादा कोंडके यांचे रौप्य महोत्सवी सलग 25 आठवडे चालु असलेल्या सर्वाधिक नऊ चित्रपटासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात आपण दादा कोंडके यांचे काही प्रमुख चित्रपटांचा अभ्यास करणार आहोत. दादा कोंडके यांनी आपल्या चित्रपटाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केल्याच दिसून येते.

संशोधन विषयाची निवड :

दादा कोंडके दिग्दर्शीत मराठी चित्रपटातून साधलेला लोकसंवाद हा संशोधनाचा विषय निवडीमागचे कारण म्हणजे दादा कोंडके यांनी चित्रपटातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला असुन त्यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रत्येक चित्रपटाचा विषय हा समाजातील प्रत्येक घटकातील ज्या समस्या आहेत त्या समाजासमोर आणणे, सरकारवर टिका करणे त्यातून काही समस्या सुटतात का याचा त्यांनी आपल्या चित्रपटातून प्रयत्न केलेला आहे. त्यांचे चित्रपट जरी

मनोरंजनात्मक द्विअर्थी असले तरी त्यातून त्यांनी समाज प्रबोधन केलेले दिसून येते.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

1. दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटातून महाराष्ट्रीयन वर्गीयसमाजाचे स्वरुप समजून घेणे.
2. दादा कोंडके दिग्दर्शित चित्रपटाच्या चित्र भाषेचा अभ्यास करणे.
3. दादा कोंडके यांच्या चित्रपटातून ग्रामीण मानवी संबंधाचे स्वरुप जाणून घेणे.
4. दादा कोंडके दिग्दर्शित चित्रपटातून साधलेल्या लोकसंवादाची परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे.

गृहितकृत्ये :

1. दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपट महाराष्ट्रीयन ग्रामीणवर्गीय समाजाचे दर्शन घडवितात.
2. दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटांची चित्रभाषा प्रभावशाली आहे.
3. दादा कोंडके यांनी आपल्या चित्रपटातून ग्रामीण मानवी संबंधाचे यशस्वी चित्रन केले आहे.
4. दादा कोंडके दिग्दर्शित चित्रपटातून साधलेला लोकसंवाद दर्शकांवर परिणाम करणारा आहे.

संशोधन पद्धती :

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असतांना ते शास्त्रशुध्द व्हावे अचुक निष्कर्ष निघावेत, विषयाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरुप संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पध्दतीए, प्रायोगिक संशोधन पध्दती, अन्वेषणात्मक संशोधन पध्दती, आशय विश्लेषण पध्दती, सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा समावेश केला जातो.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी अन्वेषणात्मक वा परिचयात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक संमक आणि द्वितीय संमक पध्दतीचा अवलंब केला आहे.

अ) तथ्य संकलन पध्दती :

समाजिक संशोधन पध्दती ही शास्त्रीय स्वरुपाची आहे, ती अनुभव प्रामाण्यावर आधारलेली आहे. सामाजिक संशोधनात समस्या निर्धारण झाले की त्या विषयासंबंधी तथ्य किंवा समक गोळा करावे लागतात. त्यानंतर संकलीत केलेल्या तथ्याचे वर्गीकरण संकलन करुन समस्येची सोडवणुक केली जाते. गुड व हॅटच्या मते ''एक अनुभव सिध्द सतयापनिय अवलोकन म्हणजे तथ्य होय, तसेच निश्चित उद्देशाने संग्रहीत केलेल्या संपूर्ण संख्येच्या समुदायाला तथ्य किंवा संमक म्हणतात.'' तथ्य संकलन करण्याच्या दोन पध्दती आहेत. एक प्राथमिक संमक आणि दुसरी म्हणजे द्वितीय संमक होय.

ब) तथ्य संकलनाचे स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम दोन्ही स्त्रोताचा किंवा तंत्राचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

1. प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्वरुपाचे तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत अनुसुची तयार करुन घेतली जाणार आहे व त्या आधारे परभणी व नांदेड जिल्ह्यातील चित्रपट पाहणाऱ्या 100 प्रेक्षकांकडून त्यांच्या मुलाखती घेऊन अनुसुची स्वतः भरुन घेतली जाणार आहे.

2. दुय्यम स्त्रोत :

अध्ययन विषयाशी संबंधी दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी दादा कोंडके दिग्दर्शित चित्रपटावर झालेले लिखान, पुस्तके, पुरवण्या, साप्ताहिके, दिवाळी अंक, चित्रपट समीक्षा, चित्रपट डायरी, दिग्दर्शकाचे आत्मकथन, मनोरंजनात्मक साहित्य इत्यादीमधून माहिती गोळा केली जाणार आहे.

3. साहित्य सर्वेक्षण :

संशोधनाच्या सामुग्रीचे सर्वेक्षण करणे कसे अगत्याचे आहे हे सांगतांना डॉ. पु.ल. भांडारकर म्हणतात संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधीत साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेषणात्मक अध्ययनातील एक महत्वाचा भाग होय. दादा कोंडके दिग्दर्शीत चित्रपटाबाबत आजपर्यंत जे संशोधन झाले त्याचा येथे कालबध्द आढावा घेण्यात येणार आहे. तसेच कम्युनिकेशन, संचार माध्यम इत्यादी संशोधन पर नियतकालिकामधून प्रकाशित झालेल्या लेखांचा सारांश सुध्दा अभ्यासासाठी आधार म्हणून घेतला जाणार आहे.

4. अनुभव सर्वेक्षण :

अन्वेषणात्मक आराखडा वापरत असतांना अनुभवाचे शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन सर्वेक्षण करावे लागते व असे सर्वेक्षण करतांना सामाजिक पाहणीचे शास्त्रीय संकेत काळजीपुर्वक पाळावे लागतात. डॉ.पु.ल. भांडारकर म्हणतात संशोधन कर्ता जे विषय क्षेत्र निवडतो त्यांच्या बाबतीत इतरांना काय माहिती आहे किंवा इतरांचा काय अनभुव आहे हेसंशोधनकर्त्यांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रस्तुत संशोधनात आपण 100 प्रेक्षकांचे अनुभव सर्वेक्षण पध्दतीने संकलन करणार आहोत.

5. आशय विश्लेषण :

उपलब्ध माहितीचे संकलन केल्यानंतर तिचे शास्त्रीय वर्गीकरण करण्याच्या पध्दतीला आशय विलेषण असे म्हटले जाते. हि पद्धती सामाजिकशास्त्रामध्ये अत्यंत योजकतेने विकसित करण्यात आली आहे. बॅरलसन यांनी म्हटले आहे 'संवादातील आशयाचे वस्तुनिष्ठ सुनियोजित व संख्यात्मक विश्लेषणाच्या संशोधन तंत्रास आशय विश्लेषण म्हणतात.'

चिटपटातून दिग्दर्शक हा संगीत, संवाद, गीत व प्रसंग याद्वारे प्रेक्षकांशी संवाद साधत असतो. त्यामुळे दिग्दर्शकाला जे काही सांगावयाचे आहे ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात दिग्दर्शक कितपत यशस्वी झाल आहे? हे आशय विश्लेषणाद्वारे समजू शकते. या अभ्यासात प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन केले जाणार आहे ही माहिती पुढे विश्लेषण करुन यथार्थपणे मांडली जाणार आहे.

संशोधनाची विषयाची व्याप्ती व मर्यादा :

''दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटांतून साधलेला लोकसंवाद'' या शोध प्रबंधाचा अभ्यास करतांना दादा कोंडके दिग्दर्शित केवळ पाच चित्रपटांचा त्यामध्ये राम राम गंगाराम, पांडु हवालदार, बोट लावील तिथं गुदगुल्या, मुका घ्या मुका, तुमचं आमचं जमलं या चित्रपटाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :

''दादा कोंडके दिग्दर्शित मराठी चित्रपटातून साधलेला लोकसंवाद'' या विषयाच्या उद्दिष्टानुसार अभ्यास करण्यासाठी 1970 ते 1990 या 20 वर्षात दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरणाची मांडणी :

1. प्रस्तावना
2. संशोधन पध्दती
3. संशोधन साहित्याचे पुनर्वविलोकीकरण
4. चित्रपटाचा इतिहास व विकास
5. मराठी चित्रपटाचा जनसंवाद
6. मराठी चित्रपटाबद्दल लोकांच्या अपेक्षा, विश्लेषण.
7. निष्कर्ष

संदर्भ सुची :

1. डॉ. सुधाकर पवार, वृत्तपत्र व्यवसाय काल आणि आज, प्रथम आवृत्ती, 1986.
2. डॉ.वि.ल. धारुरकर, माध्यम समीक्षा, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 1988.
3. श्रीपाद भालचंद्र जोशी, संवादशास्त्र, संभव प्रकाशन, रामेश्वरी दूध केंद्र मार्ग, रामेश्वर, नागपुर, प्र्रथम आवृत्ती, 1990.
4. शि.वा. पाठक, फिरता सिनेमा, प्रपंच प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
5. श्रीकांत रानडे, चित्रपट कसा तयार होतो?, प्रपंच प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
6. डॉ. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ नागपुर, प्रथम आवृत्ती, 1991.

7. हॅरिस ज्युलियन, लिटरकेली, जॉन्स स्टॅन्से, दि कॅम्प्लीट रिपोटर, चवथी आवृत्ती, मॅकमिलन पब्लिशिंग को, न्युयॉक, 1981 पृष्ठ क्र. २६.

8. राव चलपत, दि प्रेस नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, 1974, पृष्ठ क्र.139.

9. कामथ एम.व्ही., प्रोपेशनल जरनॅलिझम, पृष्ठ क्र. 265.

10. हॅरिस जुलियन, लिटर केली, जॉन्स स्टॅन्ले, कंपलिट रिपोर्टर मॅकमिलन, 1981, पृष्ठ क्र. 29.

11. एल्डीज एस. (संपा.), फंडामेटल ऑफ सोशिऑलोजी, थॉमस बाटा, ग्रावेल, 1950, पृष्ठ क्र. 365.

12. डॉ. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपुर, उपरोक्त, पृष्ठ क्र. 61.

13. मेलकोटे श्रीनिवास, अन कम्युनिकेशन फॉर डेव्हलपमेंट इन द र्थ वर्ल्ड, सेज प्रकाशन, 1991, पृष्ठ क्र. 5.

संशोधक

जाधव सुनिल माधवराव

M.J. & M.S., M.Phil. (Media Science)

मार्गदर्शक

डॉ. सुहास पाठक

प्राध्यापक

स्कुल ऑफ मिडीया स्टडीज

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड